दिनांक 27/09/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.45

विषय – माझी वसुंधरा अभियान 3.0 व स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत स्वच्छ व हरित सार्वजनिक, घरगुती गणेशोत्सव व गौरी सजावट स्पर्धा आयोजीत करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- दिनांक 22/08/2022 ने विभाग प्रमुख व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणीनुसार.

विटा नगरपरिषदेने मागील 5 वर्षामध्ये स्वच्छ सर्वेक्षणमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. या वर्षीही विटा नगरपरिषदेने माझी वंसुधरा अभियान व स्वच्छ सर्वेक्षण 2023 मध्ये सहभाग घेतलेला असून त्याकामी शहरामध्ये स्वच्छ व हरित सार्वजनिक, घरगुती गणेशोत्सव व गौरी सजावट स्पर्धा आयोजीत करणे आवश्यक असलेने तसेच स्पर्धेचा मुख्य उद्देश रितीरिवाजाप्रमाणे गणेशोत्सव साजरा करणे त्याचबरोबर परिसर स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाबाबतची जनजागृती नागरिकांमध्ये करणे हा उद्देश साध्य करणेसाठी स्पर्धा केली होती.या स्पर्धासाठी खालील प्रमाणे बक्षिसाची रक्कम खालील प्रमाणे आवश्यक आहे.

| सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ | | | घरगुती गणेशोत्सव स्पर्धा | | |
|---|---|---|---|---|---|
| अं.क्र | गुणानुक्रम | बक्षिस | अं.क्र | गुणानुक्रम | बक्षिस |
| 1 | प्रथम | 11000/- | 1 | प्रथम | 3000/- |
| 2 | व्दितीय | 7000/- | 2 | व्दितीय | 2000/- |
| 3 | तृतीय | 5000/- | 3 | तृतीय | 1000/- |
| 4 | उत्तेजनार्थ-1 | 1000/- | 4 | उत्तेजनार्थ-1 | 700/- |
| 5 | उत्तेजनार्थ-2 | 1000/- | 5 | उत्तेजनार्थ-2 | 500/- |

तरी विटा शहरामध्ये माझी वसुंधरा अभियान व स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत हरित सार्वजनिक, घरगुती गणेशोत्सव व गौरी सजावट स्पर्धेसाठी बक्षिस रक्कम देणेबाबत मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक  27/09/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.46

विषय –   विटा नगरपरिषदेसाठी स्वच्छ सर्वेक्षण कामी Citizen engagement, citizen impact वाढविणेसंबंधी विविध प्रकारची कामे करणे, त्यासंबंधी डॉक्युमेंट तयार करणे व सादर करणेसाठी संस्था नियुक्त करणेसाठी मुदतवाढ मिळणेबाबत मक्तेदार दिव्यस्वप्न फांऊडेशन कोल्हापूर यांचे दिनांक 16/09/2022 रोजीचे अर्जावर विचार करणे.

संदर्भ- दिनांक  16/09/2022 ने विभाग प्रमुख व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणीनुसार.

विटा नगरपरिषदेसाठी स्वच्छ सर्वेक्षण कामी Citizen engagement, citizen impact वाढविणेसंबंधी विविध प्रकारची कामे करणे, त्यासंबंधी डॉक्युमेंट तयार करणे व सादर करणेसाठी संस्था नियुक्त करणेसाठी मुदतवाढ मिळणेबाबत मक्तेदार दिव्यस्वप्न फांऊडेशन, कोल्हापूर यांनी दिनांक 16/09/2022 रोजीचे अर्जाने विनंती केली आहे.हि संस्था नियुक्त करणेची निविदा स्थायी सिमती सभा ठराव नं.189 दिनांक 29/10/2021 ने दिव्यस्वप्न फांऊडेशन, कोल्हापूर यांनी मंजूर करणेत आली आहे. सदर निविदेतील मंजूर दराप्रमाणेच स्वच्छ सर्वेक्षण 2023 व माझी वंसुधरा अभियान 3.0 साठी काम करणेबाबत एक वर्षाची मुदतवाढ देणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 27/09/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 47

विषय – नगरपरिषद हद्दीतील फुलेनगर येथील नवीन स्मशानभूमीमध्ये 2 नग शवदाहीनी बसविणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ-दिनांक 22/09/2022 ने नगरअभियंता व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणीनुसार.

नगरपरिषद हद्दीतील फुलेनगर येथील नवीन स्मशानभूमीमध्ये 2 नग शवदाहिनी बसविणे आवश्यक आहे.तरी फुलेनगर येथील नवीन स्मशानभूमीत शवदाहिनी नग 2 बसविणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 27/09/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 48

विषय – नगरपरिषद हद्दीत शाहुनगर येथे बी. के. पाटील घर ते अंकुश महाडीक घरापर्यंत आर सी सी गटर करणे व पेव्हिंग ब्लॉक बसविणे करणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.(अं.र.रू.3,92,986/-)

संदर्भ- 1)विशेष सभा ठराव नं.97 दिनांक 21/12/2021 अन्वये

2) शासन निर्णय क्र.नपावै-2022/प्र.क्र.139ड (38)/नवि-16 मंत्रालय, मंबई दि.19/06/2022

3) नगरपरिषदेकडील प्रमाणपत्र जा.क्रं.1971 दि.22/08/2022

4) दिनांक 16/09/2022 रोजीची नगरअभियंता व मुख्याधिकारी यांची मंजूर टिपणी.

नगरपरिषद हद्दीत शाहुनगर येथे बी. के. पाटील घर ते अंकुश महाडीक घरापर्यंत आर सी सी गटर करणे व पेव्हिंग ब्लॉक बसविणे करणेकामी खालील ई निविदा दाखल आहेत.

| | |
|---|---|
| 1) रोहित राजकुमार सुर्यवंशी | अंदाजपत्रकीय दराने |
| 2) श्री.गणेश एंटरप्राईजेस | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 3% जादा दराने |
| 3) विक्रांत बागल | अंदाजपत्रकीय दराने |

सदर कामाच्या वरील तीन निविदा प्रप्त झाल्या होत्या तथापी दरम्यानच्या कालावधीत संदर्भ क्रं.2 शासन निर्णयान्वये अ.क्र.18 नुसार प्रभाग क्रं.12 जिजाई बिल्डींग ते कुलकर्णी घर रस्ता व गटर करणे यासाठी शासनाकडून रक्कम रूपये 15.00 लक्ष रक्कम रूपये मंजूर करणेत आलेले आहेत. त्यानुसार नगरपरिषेदेने संदर्भ क्रं. 3 नुसार सार्वजनिक बांधकाम विभागास सदर कामांसह इतर कामांना नाहरकत प्रमाणपत्रे दिलेली आहेत. त्यामुळे नगरपरिषेदेकडून विकास शुल्क मधून घेणेत आलेले वरील काम व शासन निर्णयातील काम एकच असलेने सदरची निविदा नामंजूर करीत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 27/09/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 49

विषय – नगरपरिषद हद्दीतील मालमत्तांचे ( जमिनी व इमारती) करयोग्य मुल्य पध्दतीने सर्वेक्षण करून आवश्यक माहिती संकलित करणे, करमुल्यांकन व संगणक आज्ञावली विकसीत करून पुरविणे, आवश्यक तांत्रिक सेवा, तांत्रिक पुरवठा व इतर अनुषंगिक कामे करणेकामी दाखल ई- निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ-दिनांक 12/09/2022 चे कर अधिक्षक व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणी नुसार.

नगरपरिषद हद्दीतील मालमत्तांचे (जमिनी व इमारती) करयोग्य मुल्य पध्दतीने सर्वेक्षण करून आवश्यक माहिती संकलित करणे, करमुल्यांकन व संगणक आज्ञावली विकसित करून पुरविणे, आवश्यक तांत्रिक सेवा, तांत्रिक पुरवठा व इतर अनुषंगिक कामे करणेकामी खालील ई निविदा दाखल आहेत.

1) कोर प्रोजेक्ट अँड इंजिनिअर्स, कन्सल्टन्ट प्रा.लि.,अमरावती

2) स्थापत्य कन्सल्टन्ट प्रा.लि.,अमरावती

उपरोक्त ई- निविदापैकी स्थापत्य कन्सल्टन्ट प्रा.लि.,अमरावती यांचे निविदेतील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत. परंतू लेखापरिक्षक यांचे अहवालानुसार चतुर्थ वार्षिक कर मुल्यांकन प्राप्त निविदा दराने करून घेणे हे नगरपरिषदेस आर्थिक दृष्टया परवडणारे नाही. लेखापाल यांचे अहवालानुसार पाणीपुरवठा विदयुत बील प्रती महिना 44,52,410/- येत आहे. मागील थकीत व्याज रक्कम रूपये 66,23,597/- इतके आहे. स्ट्रीट लाईट व कार्यालय प्रत्येक मिहना विदयुत बील रक्कम रूपये 10,00,000/- येत आहे. मागील थकीत व्याज रक्कम रूपये 50,00,000/- आहे. तसेच निवडणूक खर्चासाठी निधीची आवश्यकता आहे. सदर कामी येणा-या खर्चास सन 2021-2022 या अर्थसंकल्पात तरतुद केलेली नाही. सबब ई निविदा प्रकिया रद्द करून टेंडर बयाणा रक्कम संबंधितांना परत करणेत यावी. तसेच पारंपारिक पध्दतीने चतुर्थ वार्षिक कर आकारणी नगरपरिषद अधिकारी व कर्मचारी यांचेकडून करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा